# महिला व बालविकास विभाग
# जिल्हा परिषद, वाशिम

## महिला व बाल विकास  विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची व उपक्रमांची माहिती..

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा:-

- पुरक पोषण आहार
- लसीकरण
- आरोग्य तपासणी
- संदर्भ सेवा
- अनौपचारीक शिक्षण
- आरोग्य व सकस आहारबाबत शिक्षण

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना उद्दिष्टये:-

- 0 ते 6 वयोगटातील मुलांचे आरोग्य व पोषण दर्जा सुधारणे.
- बालकांच्या योग्य शारीरीक,मानसिक,व सामाजिक विकासासाठी पाया घालणे.
- बालमुत्यू,मुलांचे आजार, कुपोषण व शाळेतील मुलांची गळती यांचे प्रमाण कमी करणे.
- मातांना पोषण,आहार आणि आरोग्य या संबधी मुलांची काळजी घेण्या बाबतची क्षमता वाढविणे.
- बाल विकासास चालना मिळावी म्हणुन विविध खात्यांमध्ये धोरण व अंमलबजावणी बाबत समन्वय घडवुन आणणे.

# बोलकी अंगणवाडी










# व्हिडीओ अंगणवाडी बाबत



1.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए 2013/प्रक्र76/प्ररा-1 दिनांक 24 जानेवारी-2014

2.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 2025/प्रक्र169/E-1144526/यो-11 दिनांक 30 मे 2025

**योजनांची थोडक्यात माहिती :-** गट अ मध्ये प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजना राबविल्या जातात तसेच गट ब मध्ये वस्तू,खरेदीच्या योजना राबविल्या जातात गट अ मध्ये खालील प्रमाणे महिला व बाल कल्याण समिती यांच्या मंजूरीने सन 2025-2026 मध्ये योजना राबविण्यात येत आहे.

**योजना क्र 01 : -**

1. मुलींना व महिलांना शिलाई मशीन प्रशिक्षण देणे.

**उद्दीष्ट :-**

महिला व मुलींना महाराष्ट्र शासनाने शिलाई मशीन हि योजना अमलांत आणली आहे.यांचे उद्दीष्टे महिला व मुलींना स्वालंबन करण्याकरीता व स्वतांच्या उदरनिवाह करण्याकरीता सक्षम बनविणे असे होय. या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुंटूंब तसेच ज्या कुंटुंबाचे वार्षिक उत्पन 1 लाख 20 हजार पर्यंत असलेल्य कुंटुंबातील मुलींना देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे : -**

1. अर्जचा नमुना 2. उत्पन्नाचा दाखला 3. रहिवाशी दाखला 4.कुंटुबांचे शिधापत्रिका इ.अर्जाचा सोबत जोडलेल कागदपत्रे लावणे आवश्यक आहे.

**योजना क्र 02 : -**

**वर्ग 7 वी ते 12 पास मुलींना संगणक MSCIT प्रशिक्षण दिल्या जाणार आहे.**

**उद्दीष्ट :-**

MSCIT / CCC व समकक्ष असणारे प्रशिक्षण देणेसाठी सदरहू योजना उपयुक्त राहील त्याकरीता ग्रामीण भागातील मुलींना संगणकाचे ज्ञान त्याचा उपयोग त्यांच्या भविष्यासाठी व पुढील शिक्षणासाठी आवश्यक असल्याने त्यांची प्रगती होईल. या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुंटूंब तसेच ज्या कुंटुंबाचे वार्षिक उत्त्पन 1 लाख 20 हजार पर्यंत असलेल्य कुंटुंबातील मुलींना देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे : -**

1. अर्जचा नमुना
2. उत्पन्नाचा दाखला
3. रहिवाशी दाखला
4. कुंटुबांचे शिधापत्रिका
5. शाळेचे बोनाफाईट इ.

अर्जाचा सोबत जोडलेल कागदपत्रे लावणे आवश्यक आहे.

## योजना क्र 03 : -

## विशेष प्राविण्य गुण मिळवलेल्या मुलींचा सत्कार करणे आर्थिक मदत करणे.

**उद्दीष्ट :-**

वर्ग 10 वी व 12 वी मध्ये विशेष प्राविण्य गुण मिळवलेल्या मुलींना उच्च शिक्षणासाठी मदत करण्याच्या दुष्टीने महाराष्ट्र शासनाने सदर योजना आमलांत आणली आहे. त्याकरीता ग्रामीण भागातील मुलींना त्यांच्या भविष्यासाठी व पुढील शिक्षणासाठी आवश्यक असल्याने त्यांची प्रगती होईल. या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुंटूंब तसेच ज्या कुंटुंबाचे वार्षिक उत्पन 1 लाख 20 हजार पर्यंत असलेल्य कुंटुंबातील मुलींना देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे : -**

1. अर्जचा नमुना
2. उत्पन्नाचा दाखला
3. रहिवाशी दाखला
4. कुंटुबांचे शिधापत्रिका
5. शाळेचे 10 वी व 12 चे मार्कशीट बोर्ड प्रमाणपत्र इ.

अर्जाचा सोबत जोडलेल कागदपत्रे लावणे आवश्यक आहे.

## योजना क्र 04 : -

**वर्ग 5 वी ते 12 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना 90% अनुदानावर शिलाई मशीन पुरविणे.**

**उद्दीष्ट :-**

वर्ग 5 वी ते 12 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना महाराष्ट्र शासनाने सदर योजना आमलांत आणली आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थीनीना त्यांच्या राहत्या गावापासून शाळेत जाण्या येणासाठी 1 कि 2 कि पेक्षा जास्त अंतरावर चालत जावे लागते अशा विद्यार्थीनींना या योजनेचा लाभ देण्यात येते.

या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुंटूंब तसेच ज्या कुंटुंबाचे वार्षिक उत्त्पन 1 लाख 20 हजार पर्यंत असलेल्य कुंटुंबातील मुलींना देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे : -**

1. अर्जचा नमुना
2. उत्पन्नाचा दाखला
3. रहिवाशी दाखला
4. कुंटुबांचे शिधापत्रिका
5. शाळेचे बोनाफाईट इ.

अर्जाचा सोबत जोडलेल कागदपत्रे लावणे आवश्यक आहे.

## योजना क्र 05 : -

**अंगणवाडी केंद्राना साहित्य पुरविणे**.

**उद्दीष्ट :-**

**अंगणवाडी केंद्राना साहित्य पुरविणे हि योजना** महाराष्ट्र शासनाने आमलांत आणली आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील अंगणवाडी केंद्राना त्यांचे साहित्य ठेवण्याकरीता कपाट खरेदी करणे हि योजना राबविण्यात येत आहे.

सदर योजना हि ई निविदा /Gem Portal वरून खरेदी करून ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्राना कपाट उपलब्ध करून देण्यात येतात.

## योजना क्र 06 : -

**अंगणवाडी केंद्राकरीता नोंद पुस्तीका छपाई / एमपीआर पुरविणे.**

**उद्दीष्ट :-**

अंगणवाडी ताईना विविध नोंदी व दरमहा एमपीआर छपाई करणे करीता **हि योजना** महाराष्ट्र शासनाने आमलांत आणली आहे. अंगणवाडी केंद्राना नोंदी व दरमहा एमपीआर छपाई करणे करीता प्राप्त निधीतून अंगणवाडी केंद्राच्या खात्यावर रक्कम जमा केली जाते.

# योजना क्र 07 : - लेक लाडकी योजना



**योजना क्र 07 : -**

**प्रधानमंत्री मातृ वंदना योजना**

**योजनेची उद्दीष्टे : -**

- माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी.
- जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे आरोग्य सुधारावे आणि माता मुत्यू व बाल मुत्यू दरात घट होऊन तो नियंत्रणात रहावा.
- सदरचा लाभ हा जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर सुधारणे,स्त्री भ्रूणहत्येस अवरोध करणे आणि स्त्री जन्माचे स्वागत होण्यासाठी हितकारी ठरेल.
- लाभार्थ्यांकडून आरोग्य संस्थांच्या सुविधांचा लाभ घेण्याचे प्रमाण वाढून संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण वृध्दिंगत करणे.
- नवजान अर्भकाच्या जन्माबरोबरच जन्मनोंदणीचे प्रमाणात वाढ व्हावी.

**योजनेतंर्गत अनुज्ञेय लाभ व त्यांचे वितरण खालीलप्रमाणे राहील :**

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतंर्गत पात्र लाभार्थी महिलेने विहीत अटी,शर्ती आणि कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर तिला पहिल्या अपल्यासाठी रू.5000/- (अक्षरी रू.पाच हजार फक्त) ची रक्कम दोन हप्तांमध्ये तर दुसरे अपत्य मुलगी झाल्यास मुलीच्या जन्मानंतर एकाच टप्यात रू.6000/- (अक्षरी रू.सहा हजार फक्त) चा लाभ आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफिस मधील खात्यात (DBT) द्वारे जमा केला जाईल.

- **प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थी खालीलपैकी किमान एका गटातील असणे आवश्यक (किमान एका ओळखपत्राच्या पुराव्याची प्रत जोडणे आवश्यक) आहे.**

I. ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न्ा प्रतिवर्ष रू. 8 लाख पेक्षा कमी आहे.
II. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिला.
III. 40% व अधिक अपंगत्व असणाऱ्या (दिव्यांग जन )महिला.
IV. बीपीएल शिद्यापत्रिकाधारक महिला.
V. आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत महिला लाभार्थी
VI. ई-श्रम कार्ड धारक महिला.
VII. किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी.
VIII. मनरेगा जॉब कार्ड धारक महिला.
IX. गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका (AWW)/अंगणवाडी मदतनीस (AWHs)/आशा कार्यकर्ती (ASHAs)

❖ **वरील नमूद किमान एका कागदपत्रासोबत खालील कागदपत्रे व तपशील देणे आवश्यक आहे.**

१) लाभार्थी आधार कार्ड प्रत किंवा आधार नोंदणी (EID) कागदपत्र त्यासोबत विहित केलेले कागदपत्र.

२) परिपूर्ण भरलेले माता आणि बाल संरक्षण कार्ड ज्यामध्ये शेवटच्या मासिक पाळीची तारीख, गरोदरपणाची नोंदणी तारीख, प्रसुतीपूर्व तपासणीच्या नोंदी असाव्यात.

३) लाभार्थीच्या स्वतःच्या बैंक पासबुकची प्रत

४) बाळाचे जन्मनोंदणी प्रमाणपत्राची प्रत

५) माता आणि बाल संरक्षण कार्डवर बाळाच्या लसीकरणाच्या नोंदी असलेल्या पानाची प्रत.

६) गरोदरपणाची नोंदणी केलेला RCH पोर्टलमधील लाभार्थी नोंदणी क्रमांक.

७) लाभार्थीचा स्वतःचा किंवा कुटुंबातील सदस्यांचा मोबाईल क्रमांक.

८) वेळोवेळी विहित केलेले अन्य कागदपत्र.

❖लाभार्थीकडे आधारकार्ड नसल्यास वरील विहित कागदपत्रांसोबत आधार नोंदणी (EID) कागदपत्रासोबत खालीलपैकी कोणत्याही एका ओळखपत्राच्या पुराव्याची प्रत जोडणे आवश्यक राहील:

a. बँक किंवा पोस्ट ऑफिस फोटो पासबुक

b. मतदार ओळखपत्र

c. रेशन कार्ड

d. किसान फोटो पासबुक

e. पासपोर्ट

f. ड्रायव्हिंग लायसन्स

g. पॅन कार्ड

h. MGNREGS जॉब कार्ड

i.सरकारने किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कोणत्याही उपक्रमाद्वारे जारी केलेले तिच्या पतीचे कर्मचारी फोटो ओळखपत्र.

j. राज्य सरकार किंवा केंद्रशासित प्रदेश प्रशासनाने जारी केलेले इतर कोणतेही फोटो ओळखपत्र.

k. अधिकृत लेटरहेडवर राजपत्रित अधिकाऱ्याने जारी केलेल्या छायाचित्रासह ओळखीचे प्रमाणपत्र.

l. प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) किंवा सरकारी रुग्णालयाद्वारे दिले गेलेले आरोग्य कार्ड; राज्य सरकार किंवा केंद्रशासित प्रदेश प्रशासनाद्वारे निर्दिष्ट केलेले इतर कोणतेही दस्तऐवज आधारकार्डला पर्यायी कागदपत्र केवळ लाभार्थ्यांची योजनेमध्ये नोंदणी करण्यासाठी असुन लाभार्थ्यांना EID च्या साहाय्याने आधार कार्ड प्राप्त करुन घेऊन संबंधित आरोग्य केंद्रात सादर केल्यानंतरच लाभ रक्कम जमा होणार आहे.

**टिप :- अधिक माहिती करीता संपर्क**

**वाशिम जिल्हातील सर्व एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय,सर्व पर्यवेक्षिका,एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय संबंधीत,आपले नजीकचे अंगणवाडी केंद्र (अंगणवाडी सेविका)**

Thank You..